# जिल्हा परिषद रत्नागिरी

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन

## बांधकाम विभाग चिपळूण


| | |
|---|---|
| दुरध्वनी क्रमांक - (०२३५२) २२२३६८ | e-mail : eezpchiplun@gmail.com |
| जा.क्र.रजिप/बांधकाम चिपळूण/ए-१/टेंडर/ ४२७६/२०२३ | दिनांक :- १४.०७.२०२३ |


प्रति,

श्री.प्रशांत प्रकाश लाड,
मु.पो.कुरवळ, ता.खेड,

तालुका :- खेड, जिल्हा :- रत्नागिरी

विषय :- कामाचे कार्यारंभ आदेश.....

**मुसाड कुरवळखेड कुरवळ जावळी शिंदेवाडी रस्ता ग्रामा १८१ सा.क्र.०/०० ते २/०० डांबरीकरण करणे ता.खेड, जि.रत्नागिरी**

**लेखाशिर्ष:- गट ब (३०५४ २४१९) रस्ते व पूल दुरुस्ती सन २०२१-२२**

**अंदाजपत्रक रक्कम :- १०,००,०००/-**

**निविदा रक्कम :- ९,७३,८६४/-**

**निविदा मंजुर रक्कम :- ९,७३,८६४/-**

**निविदा सुचना क्रमांक २३ सन २०२२-२३ ( खुली निविदा) मध्ये** प्रसिध्द केलेल्या उपरोक्त कामाची आपण निविदे द्वारे मागणी केली होती. सदर कामाची निविदा, **शे.०.००% निविदा दराने म्हणजेच (९,७३,८६४/-)** मंजूर झालेली असल्याने तसेच रक्कम रुपये **५००**/-च्या मुद्रांकावर सदर कामाचा करारनामा पूर्ण करुन दिल्याने प्रशासकीय मान्यतेला अधिन राहून काम सुरू करण्यास या द्वारे आदेश देण्यात येत आहेत. तरी उपअभियंता **खेड** यांचे कडून कामाची माहिती करुन घेऊन त्याप्रमाणे कामाला सुरवात करावी. कामाची मुदत पावसाळा वगळून मुदत **दि.१५ फेब्रुवारी २०२४** पर्यंत असुन ती या आदेशाचे तारखेपासून मोजण्यात येईल.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र.जिपर २०००/प्र.क्र.८३७/३५, मंत्रालय, मुंबई दि.०८ मे २००२ चे परिपत्रकानुसार मक्तेदाराने सोपविलेले कामाचा व ते पूर्ण करण्यासाठी नियुक्त केलेल्या कामगारांचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक आहे. सदर विमा प्रत्यक्ष काम सुरु करणेपुर्वी उतरविणे बंधनकारक राहील. तसे न केल्यास दंडात्मक कारवाई करणेत येईल याची नोंद घ्यावी. तसेच गौणखनिज फी शासनास वेळच्या वेळी जमा करणे आवश्यक आहे तसेच काम सुरु करण्यापूर्वी कामाचे ठिकाणी माहितीफलक लावण्यात यावा. कामाचे देयक अनुदान उपलब्धते नुसार देण्यांत येईल. देयकातून शासकीय नियमानुसार वस्तू व सेवा कराची कपात करणेत येईल. तसेच गौणखनिज व वस्तू व सेवा कर, इतर कर शासन नियमानुसार मक्तेदाराला आदा करणेत येईल. कामातील उणीवांच्या दुरुस्ती कालावधी (Defect Liability Period हा महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१५१/इमारती-२, मुंबई ४०० ०३२ दि.१४ जानेवारी २०१९ अन्वये दोन वर्षे निर्धारीत करणेत येईल.

**सदर कार्यारंभ आदेश हा जिल्हा परिषदेच्या http://www.zpratnagiri.org या सांकेतस्थळावर उपलब्ध करणेत आलेला असून त्याचा सांकेतांक क्र.२०२३०७१६९१३९६ हा आहे.**

कार्यकारी अभियंता
बांधकाम विभाग चिपळूण
जिल्हा परिषद रत्नागिरी

प्रत :- गटविकास अधिकारी, पंचायत समिती, **खेड, ता.खेड यांना माहितीसाठी**

प्रत :- उप अभियंता, जिल्हा परिषद उपविभाग **खेड, ता.खेड** यांचेकडे

**२/- सदर कामाची जागा जिल्हा परिषदेच्या मालकीची असलेबाबत खात्री करणेत यावी. मक्तेदार यांनी उपरोक्त परिपत्रकाप्रमाणे विमा उतरविल्याची खात्री केले नंतरच कामाची माहिती व आखणी करुन दयावी. कामाचे प्रगतीकडे लक्ष द्यावे वरील सुचनाचे तंतोतंत अनुपालनाकडे लक्ष द्यावे. प्रशासकीय मान्यतेमधील अटी व शर्तीचे पालन करावे.मंजूर अनुदापेक्षा जास्त खर्च करु नये**